**निशाणी क्र. ८२**

**अभियोग पक्षातर्फे सा. क्र. ५ यांचा सरतपास शपथेवर.**

**नाव:** गोरख केरबा कसपटे

**वय:** ५५ वर्षे, **व्यवसाय:** सहा. पोलीस निरीक्षक

**नेमणूक:** टी.एम.सी. शाखा पुणे ग्रामीण

**<u>सरतपास सहाय्यक सरकारी वकील श्रीमती एन. पी. कुचेकर यांचे मार्फत सुरु</u>**

दिनांक २६/०८/२०२१ रोजी मी वालचंदनगर पोलीस ठाणे अंतर्गत भवानीनगर दुरक्षेत्र येथे सहाय्यक फौजदार म्हणून कार्यरत होतो. सदर दिवशी सायंकाळी ६:०० ते ६:३० वाजणेच्या सुमारास फिर्यादी मधुकर जाधव हे चौकीमध्ये आले व चिखली या गावामध्ये त्यांना मारहाण झालेबाबत सांगितले. त्यावेळी त्यांना पोलीस यादी दिली. सदर यादी निशाणी क्र. ६७ प्रमाणे दाखल आहे. दिनांक २९/०८/२०२१ रोजी फिर्यादी भवानीनगर दुरक्षेत्र येथे आले व ठाणे अंमलदार होळकर यांनी गुन्हयाचा प्राथमिक अहवाल नोंदविला व सदर अहवाल वालचंदनगर पोलीस ठाणे येथे पाठविला. वालचंदनगर पोलीस ठाणे येथील ठाणे अंमलदार खाडे यांनी दिनांक २९/०८/२०२१ रोजी फिर्यादीचा जबाब नोंदविला. ठाणे अंमलदार खाडे यांनी गुन्हा रजिस्टर नं. ३२६/२०२१ हा गुन्हा भारतीय दंड संहिता, कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, १४३, १४७ सह कलम १४९ अन्वये दाखल करून तपासाकामी माझ्याकडे सोपविला. तपासाच्या अनुषंगाने दिनांक ३०/०८/२०२१ रोजी मी दोन पंचांसमक्ष घटनास्थळ पंचनामा केला. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. तो तोच आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी व दोन पंचांच्या सहया आहेत. त्यास **निशाणी क्र. ८३** देण्यात येते. घटनास्थळ फिर्यादी यांनी दाखविले. चार साक्षीदारांची तपासटिपणे नोंदविली. दिनांक २१/१०/२०२१ रोजी आरोपी क्र. १ याने प्रस्तुत गुन्हयात वापरलेली काठी पोलीस ठाणे येथे जमा केली. सदर काठी जप्त करतेवेळी पंचनामा केला. आता मला जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. तो तोच असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी व दोन पंचांच्या सहया आहेत. त्यास **निशाणी क्र. ८४** देण्यात येते. गुन्हयामध्ये जप्त केलेल्या मुद्देमालाची पावती तयार करून सदर मुद्देमाल मुद्देमाल पावतीने कारकुनाकडे जमा केला. आता मला मुद्देमाल पावती दाखविण्यात आली. ती तीच असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर

माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र. ८५** देण्यात येते. दिनांक २२/१०/२०२१ रोजी प्रस्तुत गुन्हयातील सहा आरोपी न्यायालयामध्ये स्वतःहून हजर झाले व जामिनावर सुटले. त्यानंतर फिर्यादीचे वैदयकीय प्रमाणपत्र मिळणेबाबत पत्र व्यवहार केला. आता मला दिनांक ३०/०९/२०२४ रोजीचे वैदयकीय अधिकारी, बारामती यांना पाठविलेल्या पत्राची दाखविण्यात आली तीच तीच असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. ८६** देण्यात येते. तपासाअंती आरोपींविरूध्द सबळ पुरावा मिळून आल्याने भारतीय दंड संहिता, कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, १४३, १४७ सह कलम १४९ अन्वये दोषारोपपत्र दाखल केले. प्रस्तुत गुन्हयातील जप्त मुद्देमाल दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता मला अर्टिकल अ वरील मुद्देमाल दाखविण्यात आली. ती तीच आहे. मी आरोपींना ओळखतो. त्यापैकी आरोपी २ आजरोजी न्यायालयात हजर आहेत.

सरतपास पूर्ण.

**<u>उलटतपास आरोपींतर्फे वकील श्री. एस. एस. टिळेकर यांचे मार्फत</u>**

**२.** हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत खटल्यातील गुन्हा दिनांक २९/०८/२०२१ रोजी दाखल झाला आहे. मी घटनास्थळाच्या आजुबाजूंच्या शेतकऱ्यांची तपासटिपणे नोंदविली नाही. प्रस्तुत गुन्हा आरोपी व फिर्यादी यांचेमधील हद्दीच्या वादातूनच भांडण झाल्यामुळे दाखल झाल्याचे तपासाअंती निदर्शणास आले. हे म्हणणे खरे आहे की, मौजे चिखली येथील गट क्र. ३ मधील फिर्यादीची शेत जमिन आहे व आरोपींची जमिन गट क्र. ४ मध्ये आहे. फिर्यादीने गट क्र. ३ ची मोजणी पोलीस संरक्षणामध्ये केली होती किंवा कसे याबाबत मला माहिती नाही. मोजणी अधिकाराने पोलीस संरक्षामध्येच गट क्र. ३ च्या हद्दीखुणा कायम करून दिल्या होत्या किंवा कसे हे मला माहिती नाही. मोजणी अंती फिर्यादीने आरोपींच्या शेतामध्ये अतिक्रमण केल्याचे निष्पन्न झाल्याने त्याला ते अतिक्रमण काढून दयावे लागले होते किंवा कसे हे मला माहित नाही. मौजे चिखली येथील गट क्र. ३ च्या मोजणीबाबतची कागदपत्रे मी तपासाकामी हस्तगत केली नाहीत. मी माझ्याकडे जो गुन्हा तपासाकरिता आला त्या गुन्हयाच्या अनुषंगानेच तपास केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी फिर्यादीस पुरक असा तपास केला व फिर्यादीच्या सांगणेप्रमाणेच

तपास केला. साक्षीदार स्वत: सांगतो मी माझ्या पध्दतीने तपास केला आहे. तपासादरम्यान मला अभिजित उर्फ भैय्या दराडे या नावाची व्यक्ती आढळून आली. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीमध्ये नमुद केल्याप्रमाणे अभिजित उर्फ भैय्या दराडे या नावाची व्यक्ती अस्तित्वात नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुत गुन्हयातील घटनास्थळ पंचनामा मी भवानीनगर दुरक्षेत्र येथे बसूनच तयार केला व नेहमीच्या पंचांच्या सहया घेतल्या. हे म्हणणे खरे नाही की, अर्टिकल ‘अ’ वरील वस्तुचा व्यास १ इंच नाही. हे म्हणणे खरे आहे की, अर्टिकल ‘अ’ वरील वस्तुचा एका बाजुचा व्यास १ इंचापेक्षा जास्त आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुत गुन्हयाचा तपास करतेवेळी माझ्यावर स्थानिक राजकीय लोकांचा दबाव होता. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ३०/०९/२०२४ रोजीपूर्वी प्रस्तुत गुन्हयातील जखमीचे वैदयकीय प्रमाणपत्र मी हस्तगत केलेले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ०५/१०/२०२४ रोजी मी प्रस्तुत गुन्हयातील जखमीचे वैदयकीय प्रमाणपत्र अभिलेखावर दाखल करणेस परवानगी मिळणेबाबत अर्ज सादर केला होता. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ०५/१०/२०२४ च्या अर्जामध्ये जखमीचे वैदयकीय प्रमाणपत्र मी दिनांक ०४/१०/२०२१ रोजी ताब्यात घेतल्याचे नमूद केले आहे. साक्षीदार स्वत: सांगतो सदर २०२१ हे साल माझ्याकडून चुकून नमूद केले गेले होते. वैदयकीय प्रमाणपत्र अधिकारी यांनी दिनांक ०४/१०/२०२४ रोजी माझ्या ताब्यात दिले. वैदयकीय अधिकारी ज्या दिवशी वैदयकीय प्रमाणपत्र देतात तीच तारीख प्रमाणपत्रावर नमुद करतात किंवा कसे हे मी सांगू शकत नाही. वैदयकीय प्रमाणपत्रावर ०४/१०/२०२४ ही तारीख नमूद आहे किंवा कसे हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुत गुन्हयाच्या तपासाच्या अनुषंगाने फिर्यादी व आरोपीमध्ये नेमका कोणता वाद आहे याबाबत मी सखोल तपास केलेला नाही. दिनांक २६/०८/२०२१ रोजी मुक्ताबाई दराडे या भवानीनगर दुरक्षेत्र येथे आल्या होत्या किंवा कसे त्याचप्रमाणे मी त्यांना यादी दिली होती किंवा कसे हे मला माहित नाही. दिनांक २६/०८/२०२१ रोजीच मुक्ताबाई दराडे यांनी प्रस्तुत गुन्हयातील फिर्यादी व साक्षीदार यांनी तिला मारहाण केल्याबाबत सांगितले होते किंवा कसे हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ ने मला

कोणतिही काठी आणून दिलेली नाही व मी जप्ती पंचनामा केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, वैदयकीय प्रमाणपत्र कोणत्या अधिकाऱ्याने दिले आहे हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुत गुन्हयातील फिर्यादीनेच आरोपी क्र. १ व त्याच्या आईला मारहाण केली त्याचप्रमाणे आरोपी क्र. १ च्या आईच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले असे प्रस्तुत गुन्हयाच्याअंती निष्पन्न झाले. फिर्यादीचे स्थानिक राजकारणी लोकांसोबत चांगले संबंध आहेत किंवा कसे हे मी सांगू शकत नाही. प्रस्तुत गुन्हयातील आरोपी हर्षवर्धन पाटील गटाचे समर्थक आहेत किंवा कसे हे मला माहित नाही. चिखली गावामध्ये दोन राजकीय पक्षांचे गट आहेत किंवा कसे हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पारदर्शकपणे तपास न करता आरोपींविरूध्द कोणताही सबळ पुरावा मिळून आला नसताना देखील फिर्यादीला मदत व्हावे म्हणून खोटे दोषारोपपत्र दाखल केले आहे व आजरोजी खोटी साक्षी देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा आहे.

उलटतपास पूर्ण.
फेरतपास नाही.

माझे समक्ष व श्रवणोत्तर स्विकृत,

स्वाक्षरी/—

ठिकाण इंदापूर
दिनांक २१/०७/२०२५

(एस. बी. लेंडवे)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, इंदापूर.